# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.08.2024** **वार– शुक्रवार**

---

**राष्ट्रीय पुरस्कार**

पुण्याचे तरूण चित्रपट दिग्दर्शक सोहिल वैद्य यांच्या 'मर्मर्स ऑफ दी जंगल' (आदिगुंजन) या लघु पटाला आज सर्वोत्कृष्ट लघु पटाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. आज नवी दिल्लीत राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा झाली.

**अभय योजना**

अभय योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची मुदत 31 ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. पुणे तसंच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांनी या योजनेच्या लाभासाठी अर्ज करावा. योजनेची माहिती नोंदणी आणि मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या योजनेअंतर्गत मुद्रांक शुल्क आणि दंडामध्ये सवलत देण्यात येते. मागणी नोटीस विहीत वेळेत देता यावी याकरीता नागरिकांनी 25 ऑगस्टपर्यंत प्रकरणे दाखल करावी असं पुणे शहराचे सह-जिल्हा निबंधक वर्ग-1 माईनकर यांनी कळवलं आहे.

**वाहतूक बदल**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उद्या बालेवाडी येथे होणार आहे. त्यामुळे बाणेर रस्ता आणि बालेवाडी इथल्या वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. तसंच उद्या अवजड वाहनांना बाणेर रस्त्यावर बंदी घालण्यात आली आहे अशी माहिती वाहतूक विभागानं दिली आहे.

**रोजगार मेळावा**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत पुण्यातल्या गणेश कला क्रीडा मंच इथं आज सकाळी साडे दहा वाजता रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. पुणे

महानगरपालिकेच्या विविध विभागात अकराशे हून अधिक प्रशिक्षार्थ्यांची या योजनेंतर्गत निवड करण्याकरिता या रोजगार मेळाव्यांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**अंदाजपत्रकात/नागरी/सहभाग**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' या महत्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते आज करण्यात आला. पिंपरी-चिंचवड शहरातील विविध उपाययोजना, उपक्रम, प्रकल्प यामध्ये नागरिकांचा सहभाग असावा या दृष्टीनं या उपक्रमाच्या माध्यमातून रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने, क्रीडांगणे आणि सार्वजनिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी किंवा नव्याने मागणी करण्यासाठी "पीसीएमसी स्मार्ट सारथी" या मोबाईल ॲप वर आता नागरिकांना त्यांच्या अपेक्षा, सूचना, कल्पना आता घर बसल्या नोंदवता येणार आहेत. यापूर्वी या संदर्भात अर्ज जमा करण्यासाठी नागरिकांना महापालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयांना भेट द्यावी लागत असे.

**पाण्याचे बिल**

पुणे महापालिकेच्या हद्दीत पाण्याचा वापर औद्योगिक कारणासाठी केला जात नाही, तरीही पुणे महापालिकेकडून पाण्याचे बिल औद्योगिक दराने आकारलं जात आहे. महापालिकेला पाणपट्टी बिलाची रक्कम 78 कोटी रुपये असताना दंडाची रक्कम 265 कोटी आकारण्यात आली आहे. त्यामुळे पुणेकर नागरिकांच्या करातून 187 कोटी रुपये भरावे लागणार आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री यांनी यात तातडीने लक्ष घालून अन्याय कारक रक्कम जलसंपदा विभागाकडून माफ करून घ्यावी, अशी मागणी माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर यांनी केली आहे.

**कमला/नेहरू/रूग्णालय**

कमला नेहरू रूग्णालयात बुधवारी तीन संशयित व्यक्तींना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर रूग्णालयाच्या सीसीटीव्ही चित्रफितीची पाहणी करून संशयित व्यक्तीचं छायाचित्र सुरक्षा विभागाकडे देण्यात आलं आहे. चित्रफिती मध्ये पाच व्यक्ती असल्याचे दिसून आलं. पोलिस प्रशासनाला ही माहिती देण्यात आली आहे.

**नोंदी विसंगती**

पुण्याच्या वानवडी परिसरातील वन विभागाच्या सुमारे 30 हेक्टर जमिनीच्या नोंदीमध्ये विसंगती आढळून आल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हा अन्वेषण

विभागाकडून या प्रकरणी स्वतंत्र चौकशी सुरु करण्यात आली आहे. 1500 कोटी रुपये बाजार मूल्य असलेल्या या जमिनीवर आलिशान गृहनिर्माण संस्था उभी असल्याचं आढळून आलं आहे. ही जमीन वन विभागासाठी आरक्षित असल्याचे कागदोपत्री पुरावे याचिकाकर्त्यानं न्यायालयात सादर केले असून प्रत्यक्षात मात्र या जमिनीवरील आरक्षण उठवून अन्य कारणासाठी त्याचा वापर झाल्याचा आरोप होत आहे.

**गांधर्व-सोहोळा**

पुण्यातील गांधर्व महाविद्यालयाचे प्राचार्य पंडित प्रमोद मराठे आणि शिष्य परिवारा तर्फे गांधर्व महाविद्यालयातील विष्णू विनायक स्वर मंदिरात दोन दिवसीय गुरू अभिवादन सोहळ्याचं नुकतंच आयोजन करण्यात आलं होतं. कसून रियाज जरी महत्वाचा असला तरी आपण विद्यार्थ्यांना कधीही मानसिक ताण दिला नाही. विद्यार्थी मोकळेपणात आपले से होतात यावर माझा  विश्वास आहे असं यावेळी बोलताना पंडित प्रमोद मराठे म्हणाले.

**क्रिकेट**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं स्पोटर्स फिल्ड मान्सुन लीग’   अजिंक्यपद 14 वर्षाखालील 30 षटकांच्या क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेत अजिंक्य पुजारी यानं केलेल्या महत्वपूर्ण धावांच्या जोरावर हेमंत किणीकर क्रिकेट ॲकॅडमीचा सनराईज क्रिकेट ॲकॅडमीचा एक गडी राखून पराभव करत सलग तिसरा विजय मिळवला, तर अन्य दुसऱ्या सामन्यात ऋषभ कुलकर्णी यानं केलेल्या नाबाद खेळीमुळे एके स्पोटर्स क्रिकेट ॲकॅडमीनं विराग ॲकॅडमी संघाचा 8 गडी राखून सहज पराभव करून सलग पाचवा विजय नोंदवित स्पर्धेतील आपलं स्थान कायम ठेवलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**